# सातारा जिल्हा परिषद,सातारा
## ग्रामपंचायत विभाग

कार्यालय दुरध्वनी :- (०२१६२)२३३८४३
E-mail -: vptzpsatara2@yahoo.in

अत्यंत महत्वाचे

जा.क्र.साप्रवि/२/आस्था-२(२)/बदल्या/६११७/२०
दिनांक -: १४ : ०७ : २०२०

प्रति,

गट विकास अधिकारी,
पंचायत समिती --------------------(सर्व)

विषय -: विस्तार अधिकारी(पं), ग्रामविकास अधिकारी बदल्यांची तात्पुरती वास्तव्य सेवा ज्येष्ठता यादी सन २०२० प्रसिध्द करणेबाबत...

संदर्भ -:१.ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ दिनांक १५/५/२०१४

२.ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-४८१६/प्र.क्र.१३६/आस्था-१४ दिनांक ०२/०१/२०१७.

३. ग्रामविकास विभागाकडील शासन पुरकपत्र क्र. जिपब-४८१७/प्र.क्र. २२८/आस्था-१४ दि. ०७ मार्च २०१९.

४.ग्रामविकास विभागाकडील पत्र क्र. संकीर्ण/२०२०/प्र.क्र.२८२ /आस्था-१४ वि. ०९/०७/२०२०.

ग्रामविकास विभागाकडील उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयातील विहित केलेल्या सुधारित धोरणानुसार व त्यामध्ये विहीत केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सर्वसाधारण बदल्यांची कार्यवाही पूर्ण करणेबाबत आदेश आहेत.

आपल्यास्तरावरुन प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे व संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदीनुसार विस्तार अधिकारी(पं) या संवर्गाची प्रशासकीय व विनंती तसेच ग्रामविकास अधिकारी या संवर्गाची विनंती व आपसी बदलीसाठी बदलीपात्र विस्तार अधिकारी(पं) व ग्रामविकास अधिकारी यांची तात्पुरती वास्तव्य सेवाजेष्ठता यादी सन २०२० तयार केली असून ती यासोबत पाठविण्यात येत आहे. **सदरची यादी सातारा जिल्हा परिषदेच्या www.zpsatara.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.** तरी वरील संवर्गाच्या तात्पुरती वास्तव्य सेवा जेष्ठता यादी सन २०२० संबंधित कर्मचारी यांचे निदर्शनास आणून संबंधितांच्या स्वाक्षरी घेवून तालुकास्तरावर दप्तरी ठेवण्यात याव्यात.

सदर यादीबाबत काही हरकती/सुचना/आक्षेप आणि तक्रारी असल्यास त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह आस्थापना लिपीकाने समक्ष दि. १६/०७/२०२० पर्यंत या कार्यालयास सादर करावी. विहीत मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती यांचा विचारकेला जाणार नाही. याबाबत कोणतीही तक्रार उद्‌भवल्यास सर्वस्वी आपले कार्यालय जबाबदार राहिल याची नोंद घ्यावी.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रापं)
सातारा जिल्हा परिषद सातारा

प्रत :- सातारा जिल्हा परिषद, नोटीस बोर्ड प्रसिध्दीकरीता..

Scanned with CamScanner